# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of Illegal Property**

**Police Station** :- **Shirpur**

**Date of Good Work done** :- **07/02/2022**

**Brief of the work done :-**

वाशिम स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पोलीस स्टेशन शिरपूर येथे शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा विक्री करताना 2 इसम मिळून आल्याने त्यांना ताब्यात घेऊन त्यांचे कडून गुटखा 13 लाख रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

---

### स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई ; १२ लाख ९९ हजाराचा माल हस्तगत

## अवैध गुटख्याचा साठा पुन्हा जप्त

देशोन्नती वृत्तसंकलन...

### मालेगाव तालुक्यातील शिरपूर येथील प्रकार

**शिरपुर** ■ शासनाने प्रतिबंधित केलेल्या तंबाखुयुक्त गुटख्याचा साठा करून त्याची अवैधपणे विक्री करण्याचा गोरखधंदा दिवसेंदिवस जिल्ह्यात वाढतच आहे. काही दिवसापूर्वी रिसोड येथून लाखो रूपयांच्या गटख्याचा माल जप्त केल्यानंतर वाशिम येथील स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला शिरपूर येथून तब्बल १२ लाख ९९ हजार ७५० रूपयांचा अवैध गुटख्याचा साठा जप्त करण्यात यश आले आहे. सदर कारवाई रविवारी दि. ६ फेब्रुवारी रोजी करण्यात आली.

पोलिस अधीक्षक वाशिम यांना प्राप्त गुप्त माहितीवरून रविवारी पोलिस निरीक्षक सोमनाथ जाधव यांनी माहितीची खात्री करून मालेगाव तालुक्यातील शिरपूर येथील ओमकार कॉलनी हनुमान मंदिराजवळील गोडाऊनच्या मागे मोकळया जागेत एक इसम प्रतिबंधीत असलेला गुटखा व सुगंधीत तंबाखु अवैधरित्या साठवणूक करून चोरट्या मार्गाने विक्री करीत होता. यावरून या परिसरात उभी असलेली मारूती सुझुकी गाडी क्र.एमएच ३७ जी १८४३ पाहणी केली असता गाडीत अक्षय संजय जाधव व गणेश गजानन वाघ हे दोन इसम गुटका व पान मसालाचे पांढरे कट्टे भरताना आढळून आले. त्यांच्या जवळून नजर गुटखा दहा पोते, पान बहारचे ३ पोते असा एकूण ६ लाख ९९ हजार ७५० रूपयांचा माल सोबतच गुटखा, खर्रा, सुगंधीत तंबाखु इत्यादी मालासह मारोती व्हॅन असा १२ लाख ९९ हजार ७५० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. यातील आरोपी अक्षय संजय जाधव(वय २२) व गणेश गजानन वाघ (वय २६) यांच्यावर कारवाई करून त्यांना शिरपूर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. (वार्ता.)